**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतावादी विचार दिले - डॉ. रविंद्र मुन्द्रे**

**विद्यापीठात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' निमित्त व्याख्यान संपन्न**

अमरावती.

वागणूकीतील समानता व संधीची समानता ही भूमिका बाबासाहेबांनी सांगितली असून स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रिसूत्रीच्या मूल्यातून सामाजिक समता या देशामध्ये प्रस्थापित होवू शकेल, असे बहुमूल्य समतावादी विचार बाबासाहेबांनी दिले असून त्याची जोपासना करा, असे प्रतिपादन विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र मुन्द्रे यांनी केले. विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह निमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समातावादी दृष्टीकोन' या विषयावर डॉ.के.जी. देशमुख व्याख्यान संपन्न झाले, त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख उपस्थित होते.

डॉ. रविंद्र मुन्द्रे पुढे म्हणाले, समतावादी समाज निर्माण व्हावा, ही बाबासाहेबांची मुख्य भूमिका राहिली आहे. त्यांनी स्त्री-पुरुष समानता मांडली. मजूरमंत्री असतांना कामगारांना न्याय मिळून दिला. शोषित, पिडीत आणि स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठी लढा दिला. सूविधांची उपलब्धता हे संविधानाने दिलेले आरक्षणाचे तत्व आहे. बाबासाहेबांचा केवळ जयजयकार करुन चालणार नाही; तर त्यांनी दिलेली मूल्य व विचार एक अनुयायी म्हणून भारतीयांनी अंमलात आणण्याची खरी गरज आहे.

बाबासाहेब हा आज सर्वांच्या जगण्याचा विषय आहे. देशात आर्थिक विषमता प्रचंड वाढत आहे. १ टक्का लोकांकडे ७३ टक्के संपत्ती आहे, ते भारतासमोर एक आव्हान आहे. आर्थिक विषमता दूर व्हायला हवी, यासाठी बाबासाहेबांनी राज्य समाजवादाचे तत्व मांडले होते. लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट व्हायलाच हवी. लोकशाहीला जीवनमार्ग बनवा, असा संदेश बाबासाहेबांनी दिला असून व्यक्तीविकासाची समाजरचना या देशात निर्माण व्हावी, ही अपेक्षा बाबासाहेबांना होती, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, सर्वच क्षेत्रात बाबासाहेबांनी योगदान दिले आहे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत बाबासाहेब मोठे झाले. या देशातील सामाजिक मानसिकता बदलण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, समाजवादी दृष्टीकोन दिला. बाबासाहेबांनी या देशावर अनंत उपकार केले असून ते कधीही न विसरणारे आहेत. जातीविरहित समाज हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. बाबासाहेबांचे विचार मोठ्या मनाने सर्वांनी स्वीकारण्याची गरज असून त्यांनी सांगितलेली समता व्यवहारात आणावी, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात कर्मयोगी संत गाडगे बाबा, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन वही व पेन भेट देवून मान्यवरांनी अभिवादन केले. विद्यापीठ गीत याप्रसंगी सादर करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत शब्दसुमनाने करण्यात आले. कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे संचालन समाजशास्त्र विभागाचे डॉ. किशोर राऊत यांनी, तर आभार डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. सचिन गायकवाड यांनी मानले. याप्रसंगी विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, प्राधिकारिणी सदस्य, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. १३/०४/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी